किंमत : १० रुपये

जानेवारी २०१०

# राष्ट्रवादी


स्वाभिमानी आचार! राष्ट्रवादी विचार!!

- राष्ट्रवादीचे राष्ट्रीय अधिवेशन
- आंतरराष्ट्रीय सिंचन परिषद
- कोपनहेगेनमधील 'फियास्को'
- म. फुले समता पुरस्कार वितरण
- पक्षबांधणी महत्त्वाची
- 'ती आणि मी'चे प्रकाशन

... तर एक खिंड मी लढवीन

संपादकीय






# 'ती आणि मी' हे सहजीवनाचे प्रतिक

जळगावच्या जैन उद्योगसमुहाचे अध्यक्ष, जगविख्यात उद्योजक आणि ज्येष्ठ विचारवंत पद्मश्री डॉ. भवरलाल जैन यांनी लिहिलेल्या 'ती आणि मी' या आत्मकथनाचे प्रकाशन २८ डिसेंबर २००९ रोजी मुंबईतील रविंद्र नाट्य मंदिरामध्ये ज्येष्ठ साहित्यिक प्रा. डॉ. विजया राजाध्यक्ष यांच्या हस्ते आणि ज्येष्ठ साहित्यिक प्रा. भालचंद्र नेमाडे, कविवर्य पद्मश्री श्री. ना. धों. महानोर, ज्येष्ठ पत्रकार खा. श्री. भारतकुमार राऊत आणि माजी न्यायमूर्ती पद्मभूषण श्री. चंद्रशेखर धर्माधिकारी यांच्या उपस्थितीत संपन्न झाले. या समारंभाचा हा संक्षिप्त वृत्तांत.

# यावेळी झालेली मान्यवरांची भाषणे :-

## डॉ. भालचंद्र नेमाडे

आदरणीय विजयाबाई, माझे सर्व मित्र, अशोकजी कोठावळे, ललितचे संपादक. प्रथम या प्रकाशन समारंभासाठी मला पाहुणा म्हणून बोलावले, त्याबद्दल मी आपल्या संयोजकाचे आभार मानतो. मी हे पुस्तक लिखीत स्वरुपात एक महिन्यापूर्वी वाचले आहे आणि एरवी मी कोणत्याही पुस्तकाला प्रस्तावना देत नाही पण मला असे वाटले की, मी त्यावेळी कादंबरी लिहित होतो, जी मी आत्ताच रामदास भटकळांकडे देऊन आलो आणि त्यावेळी याच गोष्टींवर लिहीत होतो आणि कुठेतरी याचा आणि त्याचा सांधा एकच आहे असे जाणवले. तसे नाही तरी आम्ही समवयस्क आहोत भाऊ आणि मी. माझ्यापेक्षा ते कदाचित थोडेसे काही दिवसांनीच वयाने ज्येष्ठ असतील.

वाचता वाचताच माझ्या असे लक्षात आले की, या सर्व यशस्वी उद्योजकांचे वैशिष्ट्य असे असते की, त्यांना एक सामाजिक व्याकरण अतिशय पक्क माहिती असते. समाजातील कुठे काय क्रिया, कर्तापद, कर्मगोष्टी काय चाललं ते उद्योजकांना उत्कृष्ठ माहिती असते. ते कुठेतरी पुन्हा आहेच. माझी आणि त्यांची ओळख अशीच झाली, मी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठात काही कामानिमित्ताने गेलो असताना ते आले होते, तिथे महानोरांमुळे त्यांचा माझा परिचय झाला आणि ते सहज म्हणाले की, 'नेमाडे साहेब भेटत चला, दिल्या घेतल्याशिवाय काही वाढत नाही'. हे एक सामजिक व्याकरण आहे भाषेचं. ते आपल्याकडे लिहिलं गेलं जातं, सामाजिक व्याकरण काही लिहिलं गेलं नाही, पण उद्योजक आता लिहायला लागले ही चांगली गोष्ट आहे. त्यामुळे साहित्यिक आपोआपच दुबळे दिसायला लागतील आणि उद्योजकांचे हे जग पुढे येईल. (हशा...) इतके दिवस कारण नसतांना साहित्यीक स्वत:ला व्याकरण येते असे समजत होते. ते चुकीचे आहे. एक एक उद्योजक जर पुढे आले तर आपल्याला काही फार लिहिण्यासारखं राहील असे मला वाटत नाही. हे मला अगदी तीव्रतेने पहिल्यांदाच हे पुस्तक वाचताना जाणवलं. (हशा...)

उद्योजकांचे जग एक मराठी साहित्यात वाढायला लागले असंही मला वाटायला लागलं. कारण हे फार खोलपर्यंत विचार करणारी मंडळी असतात आणि ते आपण किर्लोस्करापासून तर भाऊंपर्यंत पाहिलं, तर देश बदलवणारे लोक हे आहेत खरे. आपण म्हणतो की, राजकारणी लोकांनी जग बदललं, साहित्यिकांनी जग बदलवले, विचारवंतांनी बदलवले हे काही मला खरं वाटत नाही. हे आजच्या परिस्थितीत उद्योजकांमुळेच जग जास्त बदलत आहे, असं मला पटते आणि विशेषत: उद्योजक जर भाऊंसारखे असले तर, किती बदलेल याचीही आपल्याला कल्पना येते. कारण आत्ताच भरतकुमारांनी आणि महानोरांनी सांगितलं की, जैन साम्राज्य पाहून आलो. जळगावला तर खरोखरच चक्राऊन जाण्यासारखी परिस्थिती आहे. एवढे मोठे काम त्यांनी केले आहे. आपल्या देशातील पहिली कादंबरी कोणती यावर भाऊंशी माझी चर्चा झाली. म्हणजे जशी आपण इंग्रजीत चर्चा करतो की, सोळाव्या शतकात पहिली कादंबरी झाली, बॉन्देलोने लिहिली, बोकॅशीओने लिहिली, पण सहाव्या सातव्या शतकात कुठल्या तरी जैन मुनींनी त्यावेळी कादंबरी लिहिली आणि ती या बोकॅशिओच्यापेक्षा कितीतरी जास्त चांगली कादंबरी आहे याबद्दल कुठे ते जैन मुनी बोलत असतात, कुठेतरी ते ठिबक सिंचनाचं चाललेले असते, पॉलीमरचे दुसरे सुरु असते. पुन्हा डब्यांमध्ये पपईचे तुकडे करुन घालणं सुरु असते, .. अनेक प्रकार चाललेले असतात, आणि हे आपल्या सारख्याला हे खरोखरच चक्राऊन टाकणारे आहे, ते भाऊंसारखे उद्योजकच निर्माण करू शकतील असे मला वाटते. नविन असे काही मला बोलता येण्यासारखं नाही.

मला या पुस्तकाबद्दल तरी एवढेच बोलण्यासारखे आहे की, या पुस्तकातील सुरुवातीलाच ज्याबद्दल आज मी बोलणार आहे, की एक तरुण मुलगा, होतकरू, गरीब घराण्यातला, अतिशय कष्टाळू आणि मारवाडी कुटुंबातील मुलगा, एक मुलगी पहायला चालला असतो. मुलगी पाहणं हे आपल्याकडे खूप मोठं ग्रामर आहे हे आपल्याला माहितच असेल. अनेक नातेवाईक, कुटुंबातील घटक, बहिण भाऊ असे सर्व मिळून सोडवायचा प्रयत्न करत असतात. ज्याला व्याकरण चालवणे असे म्हणतात. (प्रचंड हशा...)

मी कादंबरी लिहित असताना मला नेमका हाच विषय




*भवरललाल जैन यांनी लिहिलेल्या 'ती आणि मी' या पुस्तकाच्या प्रकाशन समारंभप्रसंगी व्यासपीठावर (डावीकडून) चंद्रशेखर धर्माधिकारी, ना. धों. महानोर, भालचंद्र नेमाडे, विजया राजाध्यक्ष, भवरलाल जैन, भारतकुमार राऊत व दिलीप कोठावळे.*

सुचला. आता रामदास मला सांगणार आहे. ते कसं लिहून झालं, त्याबद्दल जास्त काही फुशारकी मारायची नाही. परंतु मी मनापासून असा विचार केला की, आपल्याकडे ज्या संस्था होत्या त्या एक एक नाहीशा होत चालल्या आणि आता त्याची भरपाई होत नाही, उदा. ग्रामसंस्था. इंग्रजांनी ठरवून ग्रामसंस्था मोडकळीस आणल्या आणि आता पंचायत सिस्टिम वगैरे असे काहीतरी सुरु करत असतात. पेपरातून फक्त भरतकुमार त्याबद्दल लिहितात बाकी, त्या प्रत्यक्षात पंचायत सिस्टीम कधीही अस्तित्त्वात येत नाही. (हशा...) असं काहीतरी मग सुरु करून मुंबई आणि दिल्लीला जे पूर्वी कधीही नव्हतं ते आज जे आलेले आहे ते दाखविले जाते. ग्रामसंस्था मोडकळीला आली आहे. की, आता गावात काही करणे शक्य झालेले नाही. दुसरी इंग्रजांनी ठरविलेली गोष्ट जी मोडून टाकली ती म्हणजे आपल्याकडील कुटुंबसंस्था. जी संयुक्त कुटुंब आपल्याकडे असायची. दहा वीस लोक आनंदाने नांदत असायचे आणि रूसवे फुगवेसुद्धा वगैरे गुपचूपच चाललेले असायचे. उघड उघड कोणी कोणाला घराबाहेर काढले किंवा त्यानी दुसरी केली याने तिसरा केला, असं काही होत नसे. म्हणजे आपल्याला जे अमेरिकेचे चित्र दिसेल कोण कोणाचा नेमका आजचा कोणाचा आहे आणि माजी कोण आहे? हे न कळण्या इतकी विवाह संस्था विशाल झालेली आहे. तितकी न होता, जी आनंदाने चाललेली होती, त्यातून अतिशय बुद्धिमंत लोक निर्माण झाले. जग बदलणारे लोकसुद्धा अगदी ब्रह्मगुप्तासारखे लोक अगदी पृथ्वी, सूर्याभोवती फिरतील हे शोधून काढावे. गौतम बुद्ध सुद्धा हे संयुक्त कुटुंबातूनच आलेले आहेत आणि महावीर भगवान हे तिर्थकर याच्यातून आलेले. हे सर्व संयुक्त कुटुंबातून आलेले लोक आहेत. महादजी शिंदेंसारखा माणूस. हे सर्व संयुक्त कुटुंब पद्धतीची उदाहरणे आहेत. युनिटरी फॅमेलीतून काही फार चांगले लोक मधल्या काळात आले असं मला काही दिसत नाही. हा माझा दुराग्रह असेल किंवा मी संयुक्त कुटुंबातून आल्यामुळे मला तसे वाटत असेल, पण अलीकडे मी ज्या काही विषयावरील संशोधन वाचलं ज्याला डार्विनची २५० वी जन्मशताब्दी काही तरी झाली. १८०८ साली जन्मलेला माणूस तो. त्या निमित्ताने २००८ साली खूप चर्चा झाली. मानसशास्त्रांची आमच्या संस्थेत आपल्या इंडियन इन्स्टिट्यूट ॲडव्हान्स स्टडीमध्ये मोठा सेमीनार झाला या विषयावर.

आज जो चर्चेला विषय घेतला तो एन.पी.आय. जो

आपल्या सायकलॉजीस्टच्या लोकांना माहिती असेल. मेल पेरेंटल इन्व्हेस्टमेंट म्हणजे युरोपात आणि विशेषत: पाश्चात्य संस्कृतीत पुरुषांची आपल्या कुटुंबात किती गुंतवणूक असते. पेरेंटल इन्व्हेस्टमेंट किती असते यावर ती सबंध चर्चा आहे. पेरेंटल इन्व्हेस्टमेंट म्हणजे आपल्या स्वत:च्या काही बुद्धिमत्ता, आकांक्षा असतील त्या बाजुला ठेऊन त्या मुलांपर्यंत पोहोचविणे किंवा त्या मुलांच्या वृत्तीत घालणं. आपल्या कुटुंब संस्थांमध्ये नेमकी उत्क्रांती कोणती झाली? उत्क्रांतीचा अर्थ परिपूर्णता, परफेक्शन असा होत नाही. याचा अर्थ असा आहे की, जी परिस्थिती आज आपल्यासमोर आली आहे. तिच्यावर मात करण्यासाठी आपण कोणत्या योजना वापरतो, युक्त्या वापरतो, त्याची एक रेकॉर्ड एवढाच अर्थ उत्क्रांतीचा होतो. त्यामुळे संयुक्त कुटुंबातून युनिटरी फॅमेली ही उत्क्रांत झाली असे म्हणण्यात काहीही अर्थ नाही किंवा ती झाली असली तर ती परफेक्ट आहे असेही म्हणण्यात काही अर्थ नाही. कदाचित आपल्याला एक पाऊल मागे जाण्यासारखी परिस्थिती येईल, कारण मुलांना सांभाळण्यासाठी एखादा माणूस भाड्याने ठेवण्यापेक्षा निश्चितच, आपली नातवंड आजी-आजोबा हेच चांगली सांभाळतील, असे केव्हा तरी लक्षात येईल तेव्हा ही युथ क्रांती मागे जाईल. ती युनिटरी जाईल यातली परंतु मुद्दा मला असा सांगायचा आहे की, 'ती आणि मी' ची सुरुवात अशा या विवाह संस्थेच्या, मुलगी पाहण्याच्या निमित्ताने झाली आहे आणि भाऊंनी उत्कृष्ट साहित्यिकासारखं स्वत:पुरता ते जग न ठेवता नेहमी कांताबाईचं चरित्र म्हणूनच ते आत्मचरित्र लिहिलेलं आहे. आपल्याकडे असं एक उदाहरण आठवते, की, स्मृति चित्राचं की स्वत:ला विसरुन बाईंनी रेव्हरंड टिळकांचे चरित्र लिहिले आणि ही जी दुर्मिळ गोष्ट साहित्यात घडते की, आत्मचरित्र लिहून त्याचे चरित्र लिहिणं हे फार थोड्या साहित्यिकांना जमते. आत्मचरित्र लिहिता लिहिता स्वत:चंही आत्मचरित्र लिहिता येत नाही इतक्या खालपर्यंत माणसं जातात. परंतु दुसऱ्याचे चरित्र लिहावे आणि आपलीही त्याच्याशी जी जडण-घडण आहे ती मांडावी याचे उत्कृष्ट उदाहरण यात मला दिसले.

यात काही उदाहरणे तुम्हाला पानोपानी दिसतील, अतिशय गरीब कुटुंबात १५-१६ लोकं सांभाळली. हे मी जे म्हणालो, हे आपल्या लोकांचे एन.पी. आय. जे चाललेले आहे, ते बदलून आपल्याकडे नुसता मानसशास्त्र हा विषय शिकविला जातो. जसं तत्त्वज्ञान हा एक अभ्यासक्रमातील एक विषय असतो तसा मानसशास्त्र हाही एक विषय असतो. त्यामुळे आज आपली काय सामजिक परिस्थिती आहे आणि त्याचे मानसशास्त्र काय आहे याचा अभ्यास आपण अजिबात करीत नाही. त्यामुळे आज आपली जर परिस्थिती पाहिली तर आपले खरं एफ. पी. आय. किती? असं रिसर्च व्हायला पाहिजे, ही फिमेल पेरेंटल इन्व्हेस्टमेंट किती असते? तर सगळीच गुंतवणूक आपल्याकडे असते आणि हे महात्मा गांधीं पर्यंतसुद्धा दिसते की, स्त्रीचे गुण महात्मा गांधींमध्ये जास्त होते. त्यामुळे ते महापुरूष होऊ शकले आणि एवढा मोठा महापुरुष युरोपातसुद्धा मागील गेल्या शंभर वर्षात झाला नाही. हे एफ.पी.आय. यावर एक सामाजिक संशोधन करून हे मुल्य म्हणून किंवा आपल्या देशातील मूल्य म्हणून ते मान्य करणे आपण आवश्यक आहे. एन.पी.आय. पेक्षा एफ.पी. आय. त्यामुळे जास्त वाटतात. तर या विषयावर आणखी एक नविन विचार करता येईल की, भाऊंच्या या आत्मचरित्रातून वाचल्यानंतर मला सूचलेले विचार याबद्दल मी त्यांचा अतिशय आभारी आहे.

पण दुसरे एक तत्त्व की, सुरुवातच या तऱ्हेची आहे की, ते कुठेतरी चाळीसगावला मुलगी पहायला चालले असतात आणि त्यांचा एक मित्र असतो बरोबर. हा मित्र फार महत्त्वाचा असतो अशा वेळी. कारण तो आपल्याला बरोबर कान धरून दाखवत असतो. तसा हा बरोबर आहे. तो त्याला मुद्दाम कान धरून शिकवत असतो. (हशा...) हेही पुन्हा आपल्याला एक तपासून पहावे लागेल की, निवड निवड हे आपल्याकडे चाललेलं असते ... भरतकुमार ते नेहमीच एडीट करत असतात. ही निवड म्हणजे काय? तर ते शेवटी त्या कॉलममध्ये असते,...चार ओळीत सांगितलेले असते. इतकं हास्यास्पद ते निवडीचं तत्त्व झालेलं आहे आता.. म्हणजे त्याच्या शेवटी ज्याच्याकडे टाटा स्टीलचे इतके शेअर्स असतील. तरच असाच तो फक्त वर पाहिजे ..... एवढंच त्या निवडीच्या शेवटी राहायचं आहे.(हशा...) बाकी सगळं असते. हे निवडीचे सोंग म्हणजे पूर्णपणे भांडवलशाही, शहरी आणि पाश्चात्य असे हे एक खूळ आहे असे मला वाटते. कारण अशी कुठलीच मुलगी नसते किंवा वधु नसते की जी सुंदर नसते. तेव्हा पुन्हा सुंदर वधू पाहिजे हे म्हणण्यात अर्थ नाही. दुसरी गोष्ट अशी आहे की, या सौंदर्याचे काय मुल्य असणार? आणि ही तुम्ही कशी काय ठरवणार याचे पण वस्तुनिष्ठ निकष नाहीत. पण शेवटी हे सामाजिकतेवर येते की यातूनच ही निवड होत राहते आणि आपण जे पाहतो, की राजस्थानात चारशे वधु-वरांचा मेळावा झाला किंवा भिल्लांचं मी स्वत:

पाहिलं आहे की, सात-आठशे भिल्ल तरुणी आणि तरुण एकत्र आले तर त्या दिवशी त्यांचे लग्न होतात. निवड एका दिवसापुरती असते, ते तिथे काही गोत्र, नाडी किंवा फ्लॅट किती आहे, प्रॉपर्टी किती आहेत, बहिणी किती आहेत, भाऊ किती आहेत असं नसते. (हशा...) या मायनस गोष्टी आहेत त्यातल्या भाऊ असणे वगैरे. एका दिवसात ती सर्व लग्न होतात. म्हणजे तीन-चारशे लग्न निवड या तत्त्वावर होतात. म्हणजे ती निवड मला वाटते की, पाश्चात्य, उच्चवर्णीय, उच्च जातीय किंवा भांडवली निवडीपेक्षा ही निवड जास्त चांगली असते, असे मी समजतो. कारण ही जास्त टिकतात. ही निवड झालेली वर्तमानपत्रातील आणि प्रेमातली कुटुंब टिकतील अशी मला खात्री देता येत नाही. असे इतिहास तरी सांगतो.

अजून आपल्याला एक 'ती आणि मी' च्या बाबतीत सांगता येईल की, एक मोठा कॉगनेटींग रिसर्च चाललेला असतो आणि त्यांच्यात मेंदूवर जे परिणाम झालेले असतात. ते सुद्धा इव्होलेशनमध्ये झाले असे मानलं जातं. आपल्याकडील विवाहाच्या ज्या पद्धती आहेत, याचा पुन्हा अभ्यास केला, तर यात या काही फार चांगल्या आहेत असे अजिबात म्हणता येणार नाही. परंतु आज आपण समजतो त्या मुल्यांपेक्षा या आधीच्या विवाह संस्थेची मूल्य फार महत्त्वाची. राजवाड्यांपासून अगदी अलीकडे लोकमान्य गृहाचं पळशीकर विवाह संस्थेबद्दलचे पुस्तक. अगदी इतिहास जरी पाहिला तरी सर्वांनी सत्य मानलेले आहे की, शेवटी विवाह संस्था ही टिकून आहे ती कशामुळे? तर मोनोगामीमुळे कशामुळे टिकून आहे? एकविवाह तत्त्व तर हे मानण्यावर आहे की, एक विवाह स्त्री तत्त्व असते आणि एक पुरुष तत्त्व असते आणि त्यांचे एक जो संयम असतो तो एक सामाजिकरणासाठी आवश्यक असतो म्हणून उत्क्रांतीच्या तत्त्वात विवाह संस्थेचे तत्त्व मान्य झालेलं आहे. हे अगदी पन्नास टक्क्यांपर्यंत अमेरिकेत फारकती जरी होत आल्या तरी विवाह संस्थेचे तत्त्व म्हणून कोणीही शहाणा माणूस रीजेक्ट करीत नाही, ते मान्यच करावे लागते आणि या गोष्टी अब्रेशन समजल्या जातात. म्हणजे जे व्हेरीएशन आहेत, हे तत्त्व नाहीत. हे तत्त्व म्हणून पाळणारे आपल्या समाजात अत्यंत विहंगम दृश्य आपल्याला 'ती आणि मी' मध्ये सुरुवातीपासून दिसते आणि हे असाव्य ऐकताच 'ती आणि मी' मधलं नाही. हा आपल्या देशातलाच एक मुल्य म्हणून मानलेला व्यवहार आहे की, एकदा विवाह मानल्यानंतर, विनोदाची गोष्ट म्हणजे प्रस्तावनेत मांडलेला आहे की, भाऊंची आई असे म्हणते की, ए बाबा एकदाच आपण लग्न करतो, ते तरी नीट करावे (हशा...) अनेकदा लग्न करायचं असलं तर बरोबर आहे... तुम्ही मग काहीही करा. एकदाच करायचं तर मग फार काळजीपूर्वक तिच्या काकाला, हिच्या घरी.. शेजाऱ्या पाजाऱ्या लोकांना विचारून ते नीट करायला पाहिजे. हे बरोबर आहे. विशेषत: आणि तेही शेजाऱ्यांच्याशिवाय कोणी नीट सांगत नाही. हे त्यातलं फार महत्त्वाचं आहे. बारीक-सारीक गोष्टीसुद्धा त्यातून बाहेर येतात आणि निवडीचे अगदी सुपर असे तत्त्व मला नाही वाटत दुसऱ्या कोणत्याही समाजाने विकसित केले असेल, म्हणून हे आपल्याला शिरोधार्य मानावं लागते. मी, शेवटी आणखी एक महत्त्वाचा मुद्दा मांडतो की, यातून जे समाजीकरणाचं आणि फिमेल पेरेंटल गुंतवणूक असते. ती करताना नेहमी आपल्या गोष्टींना बाजुला टाकून मग त्या आपल्या मुलापर्यंत त्या गोष्टी कशा जाव्यात याची ती गुंतवणूक असते. म्हणजे मग आपल्यात जे गुण आहेत ते त्याला सांगणं. या आमच्या गोष्टी कशा अगदी भाकरी करपू नये म्हणून ती कशी गिरवावी इथपासून ती गुंतवणूक असते आणि ही बारीक बारीक गुंतवणूक कशी शिकावी त्याची कुठेही कॉलेज किंवा आय.टी.आय. केंद्रे नसतात, ही घरातच मिळते आणि ही गुंतवणूक इतकी जबरदस्त असते की, ती जन्मभर पुरणारी असते. ती आवश्यक असते आणि त्यामुळे या आवश्यक परंतु अजुनही काही लागणाऱ्या असतात त्याचा बेस असा हा होऊ शकतो हे आपल्याला या पुस्तकातून पानोपानी पहायला मिळते. आता यातून त्याग असे जे मूल्य म्हणतो, ते आपण जरा जास्त केले आणि श्यामची आई हे पुस्तक आपण सर्वांनी वाचलेच असेल. त्यात असे आहे की, बारीक सारीक गोष्टीतून आपल्याकडे आई पहात असते की, अगदी मुलाला पडसं झालं, तर आपण काय खावं आणि काय खाऊ नये, एवढं त्यागा पर्यंत उलगडत जाते, ज्याचा अमेरिकेन सोशॉलॉजिस्ट चिफ लेबर असा उल्लेख करतो, वाईफ म्हणजे काय चिफ लेबरच असते की, एवढ्या स्वस्तात इतकं काम करणारी कोणीच मजुर मिळणार नाही! मग लग्न करुन टाक बाबा. (हशा...) म्हणजे पैसे कोण देणार! इतक्या पैशात कोण टिकवायचं म्हणजे किती पैसे लागतात. पण घरच्या घरात सगळे होऊन जाते, झाडलोट, अगदी शेतकऱ्याच्या घरात तर सारवणं, वगैरे गुरांचे गोठे स्वच्छ करणे, चारा-पाणी पासून, पाहुणे राहुणे वगैरे सर्व करणे याला किती लेबर लागते हे याचं आपल्याकडे दुदैवाने चुकून त्या असं काही एक रूपांतर करुन मोकळं करुन टाकलं. हे इतकं सोपे, याची परतफेड आणि गुंतवणुक अशा

शब्द दिल्याशिवाय हे आपल्याला नीट समजून सांगता येत नाही.

## न्या. चंद्रशेखर धर्माधिकारी

भाऊंची आणि माझी पहिली ओळख झाली ती उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या दिक्षांत समारंभामध्ये. दिक्षांत भाषण करायला मी गेलो होतो आणि माझी आठवण जर बरोबर असेल तर त्यावेळी नेमाड्यांना डी. लिट. मिळाली होती. मी तिथे बोललो आणि त्याच्यानंतर भाऊ उभे राहिले आणि असे म्हणाले की गांधींच्या नावाचे सेंटर ज्याला आपण चेअर म्हणतात ते प्रस्थापित करायचे तर मी विद्यापीठाला लागतील तेवढे पैसे द्यायला तयार आहे. मी भाऊंना उद्योजक म्हणत नाही, उद्योग सेवक म्हणतो. भाऊंच्या जीवनाच्या अडचणीच्या वेळी पुन्हा माझी आठवण जर बरोबर असेल तर आर्बिट्रेटर मला वाटते मीच होतो मी चढ-उतार पाहिले. सर्व पाहिले पण या पुस्तकाबद्दल बोलताना मी असे म्हणेल की थोडेसे आपण हे समजून घेतले पाहिजे की विवाहसंस्थेबद्दल बोलल्यानंतर आमच्या विदर्भाच्या सीमेवर वैनगंगा आणि वर्धा या दोन नद्यांचा संगम आहे पण या संगमामध्ये एकही नदी विलीन होत नाही. त्या संगमातुन नविन नदीचा उगम होतो. त्या नदीचे नाव आहे प्राणहिता. ही जी प्राणहिता नावाची नदी आहे ती वैवाहिक जीवनाचे प्रतिक आहे असे मी मानतो. कोणाचेही विलीनीकरण नाही पण दोघांच्या जीवनामधून जे एक नविन जीवन निर्माण होते ते फार वेगळे असते. आता तुमच्यासमोर सगळ्यांनी विवाहसंस्था ह्या सगळ्याबद्दल मांडल्या. भाऊ मी पहिल्यांदा नागपूरला एक छोटेसे घर बांधायला घेतले. आयुष्यात एकच घर बांधणार होतो. फार चिकित्सक होतो. माझ्या वडीलांचे जुने मित्र होते ओव्हरशियर त्यांना विचारले जरा नकाशा बनवून देता का? त्यांनी मला प्रश्न विचारला की घर बांधायचे की बंगला बांधायचा मला कळेना की या दोघांमधला फरक काय? ते मला म्हणाले ज्या वास्तुमध्ये साहेबांकरीता टॉयलेट आतमध्ये असते त्याला बंगला म्हणतात आणि ज्या वास्तुमध्ये स्वयंपाक घर आत असते आणि टॉयलेट बाहेर असते त्याला घर म्हणतात. या दोन पैकी काय बांधायचे? मी त्यांना म्हटले या दोघांचाही समन्वय करून बांधायचे (हशा).

प्रश्न उपस्थित होतो घर नावाची संस्था आता राहीली का? घर पण राहिले का? नवरा-बायकोचा संसार असतो, नवरा-बायकोचे कुटुंब नसते. आपल्याकडे पद्धत आहे बायकोलाच कुटुंब म्हणण्याची. पण ते कुटुंब नसते. नवरा-बायकोच्या पलीकडे बाकीचे रक्त संमंधी असतात. सासु-सासरे असतील, आई-वडील असतील, दिर-नंदा असतील तेव्हा घराची सुरूवात होते. पण त्यात त्याने पोट भरत नाही मग स्वायत्त नाती येतात. नाते आपण स्वतः निवडलेले असत पूर्वी प्रत्येक खेड्यात प्रत्येक नात्याने माणसे जोडलेली होती. मुसलमान असेल तर मामू होता बाकी सगळे काका होते, आमच्या बाबतीत तसे होते. दादाचे जे मित्र होते ते काका होते. त्यांची पत्नी ही मावशी होत असे. हे कुठले नाते आहे मला नाही कळणार पण प्रत्येक घर जोडले जायचे आणि स्वायत्त नात्यांमध्ये भाऊ जास्तच ताकद असते. कारण ते आपण निवडलेली असतात. रक्त संमधांवर तर जबरदस्तीने प्रेम करावे लागते. पण प्रेमाची खरी सुरूवात स्वायत्त नात्यापासून होते. पण त्यानेही काही पोट भरत नाही असे का वाटते. तो एक प्राणी असला पाहिजे. पूर्वी गाय असेल आता कुत्रा, मांजर जे असेल ते असेल पण मानलेली नाती रक्त संमधी यांच्यापुढे जाऊन प्राणी आपल्या घरामध्ये शिरतो आणि त्यानेही पोट भरत नाही तेव्हा असे वाटते बगीचा असावा, झाडे असावी, तुळस असावी. माझ्या मुंबईच्या फ्लॅटमध्ये जागा नाही पण एकच तुळशीचे झाड आहे आणि तीच सगळ्यात जास्त प्राणवायू देते पण वनस्पती, प्राणी, मानलेली नाती, रक्त संमंधातली नाती जेव्हा एकत्र राहतात तेव्हा पारिवारीक भावना-कौटुंबिक भावना आपण म्हणतो त्याची सुरूवात होते आणि भवरलालजींचे घर अशा कौटुंबिक भावनेचे प्रतिक आहे असे मी म्हणतो. त्या प्रतिकामधून जशी जशी कौटुंबिक भावना वाढत जाईल आणि जागतिक स्वरूपाची होईल मी असे मानतो जागतिकीकरणातला तो सगळ्यात मोठा प्रयोग असेल. कारण कुटुंबामध्ये माणूस उपभोग गरजेप्रमाणे घेतो आणि काम मात्र ताकदीप्रमाणे करतो. तुम्हालाही माहित आहे, मलाही माहित आहे हे कुटुंबाचे वैशिष्टे आहे. तिथे कोणतीही दुसरी भावना नसते फक्त स्नेहाने आणि प्रेमाने बांधलेली नाती झालेली असतात. तसे कुटुंब कसे भाऊंनी आजपर्यंत टिकविले त्याच्याबद्दल अजूनही मला आश्चर्य वाटते. पण बाईबद्दल लिहित असताना भाऊंनी भरभरून लिहिले त्यात आत्मनिवेदन आहे म्हणतात पण या आत्मनिवेदन शब्दामध्ये नैवद्य या शब्दाला अर्थ आहे ना तो ही सामावलेला आहे. हे नुसते आत्मकथन नाही आणि म्हणून याचे वाचन करीत असताना तुम्ही थोडेसे समजून घ्यावे लागेल. आत्मनिवेदन आत्मकथनाबद्दल असे म्हटले जाते की तुम्ही स्वतःला वगळून

तटस्थतेने ते लिहिल पाहिजे. पण तटस्थतेमध्ये जर संवेदनशीलता नसेल तर तटस्थतेला अर्थ असतो का? दगड तटस्थ असतो का? बथ्थडपणा म्हणजे तटस्थपणा. ऐकायचा विचार करावा लागतो आणि त्या दृष्टीने तुम्ही या पुस्तकाचे वाचन करावे असे मी म्हणेल. आता भारतकुमार राऊत असे म्हणाले की काही मोठी माणसे असतात आणि काही मुर्ख असतात हे दोन नसतात. दोन्ही एकच असतात. (हशा) मोठी अस्ली की ती मुर्ख असतात. मुर्ख असल्याशिवाय माणुस मोठा होत नाही सहसा माझ्या देशात. परंतु बाईंचे आणि भाऊंचे हे चरित्र वाचत असताना मला रमण महर्षींची आठवण झाली. रमण महर्षींना एकदा विचारले होते की गांधी जगभर प्रवास करतात, भारतात प्रवास करतात, तुम्ही एकाच ठिकाणी स्थिर असताना दोघांची विचारशैली एकच आहे असे कसे होते? तेव्हा त्यांनी उत्तर दिले होते रमण महर्षींनी की जात्याचे दोन भाग असतात, एक स्थिर असते आणि एक फिरणारे असते. स्थिर आणि फिरणारे यांचा समन्वय झाला नाही तर कणिक बाहेर येत नाही म्हणून बाई या स्थिर जात्याचा भाग होत्या. भाऊ हे वरती फिरणाऱ्या जात्याचा भाग होते. (टाळ्या) अशा या संयुक्त जीवनातून जे निघत ते 'ती आणि मी' निघते. ती आणि मी हे जेव्हा वेगवेगळे होत नाही तेव्हा त्याची शक्ती वेगळी असते आणि त्यातून निघणारं वेगळं असतं. आतापर्यंत साहित्यिकांनी जे आत्मनिवेदने लिहिली वगैरे सगळे काही जे लिहिले तर मी गुजरातमध्ये गेलो होतो दोन महिन्यांपुर्वी, तिथे एक नवीन शायर आला होता. त्याने दोनच वाक्य लिहिली - ''एक खता हम, उम्रभर करते रहे, धुल तो चेहरेपर थी, लेकीन आयना साफ करते रहे'' (टाळ्या) अशी आत्मनिवेदने मी वाचली आहेत. परंतु या सगळ्यातून वर जाऊन आपला चेहरा स्वच्छ ठेवून स्वच्छ घर आणि स्वच्छ कुटुंब निर्माण करणे हेच सगळ्यात मोठे बाईंचा जैन कुटुंबाला योगदान होते असे मी मानतो. हा जो स्थिर पाया होता, जात्याचा त्याच्यामुळे वरच्या माणसांना फिरता आले, वाढता आले आणि या सगळ्यामधून एक नवीन भूमिका निर्माण झाली आणि त्याच्यातून हे पुस्तक निर्माण झाले. भाऊ मला कळंत की या वयामध्ये सोबतीन गेली म्हणजे गर्दीमध्ये ही माणुस एकटा होतो आणि एकाकीपण जाणवत. कारण गर्दीतले सगळेच चेहरे इतके असे पाहिलेले असतात की त्यांचा चेहराच बिघडलेला असतो. गांधीनीही असे म्हटले आहे की मी इतके आरसे पाहिले की आता मला माझा चेहराच उरला नाही. हे सगळे पहात असताना कधीकधी असे वाटत की आपण आंधळ्यांच्या बाजारात तर आरसे विकत नाहीत ना? त्या बाजारातून जेव्हा एखादा चेहरा उचलून घ्यावा लागतो, प्रकट करावा लागतो. भाऊ आपल्या बायकोबद्दल लिहिणाऱ्या माणसाबद्दल माझ्या समाजामध्ये चांगले मत नाही, जास्तीत जास्त त्याला बायल्या म्हणतात. पति-पत्नीच्या नात्यामधून आपण काही समजुन नाही घेत. पतिव्रता स्त्रीबद्दल जेव्हा चांगले बोलले जाते तेवढे पत्नीव्रता पुरुषाबद्दल कधी बोलले जाणार नाही. एक पत्नीव्रत असावे हे ठिक आहे. पण एक पत्नीव्रत पाळत असताना त्याला व्रती शब्द लावावा तो चुकीचा का वाटतो हे मला कळले नाही, पण भाऊ हे परस्परांच्या वर एकमेकांत वाटून घेऊन तुम्ही या पुस्तकामध्ये जी एक नवीन भूमिका मांडली त्या भूमिकेला मी आज संयुक्त कुटुंबातली शक्तीची भूमिका मानतो. आज अमेरीका सुद्धा परिवाराकडे वळतेच. नाहीतर त्यांचे वाक्य होत मदरहुडने आम्हाला काहीच मिळाले नाही. पुरुषाला शरण जावे लागते. त्यामुळे आम्ही गुलामच राहिलो. त्यांनी असेही वाक्य मापल की विवाहसंस्थेमध्ये स्त्री ज्या त्यागावर उभी आहे असे म्हणता, पण तुम्ही हे विसरता की गुलामाला त्याग करण्याचा अधिकार नसतो. ती तिच्या गुलामगिरीवर उभी आहे असे म्हटले पाहिजे. या परिस्थितीमधून एक नवीन आयुष्य कसे असते? त्यात त्यागाची भुमिका दिसते जाणिव नसते. गुलामगिरी तर नसतेच नसते पण समर्पण असते पण समर्पण असले तर समर्पणामध्ये शरणागती नसते. शरणागती नसलेले समर्पण आणि त्या समर्पणातून निर्माण झालेल हे दोघांचे आयुष्य एक नवीन आयाम घेऊन आपल्यासमोर उभ राहत त्या आयामाचा आपण विचार केला पाहिजे. आपण याचाही विचार केला पाहिजे की आपल घरपण संपल. मी ज्या संस्थांमध्ये काम करतो तुम्हाला आश्चर्य वाटेल अनाथाश्रमापासून वृद्धाश्रमानंतर एक पाऊल आहे जिथे काहीच कोणी आपल्या हाताने करू शकत नाही. पलंगावर झोपलेल्या स्थितीत सर्व काही चालते. मला माहित आहे वृद्ध असलेल्या लोकांना आई-वडीलांना तिथे वृद्धाश्रमात ठेवल्यानंतर मुंबई मधल्या मुलांना तेव्हा वेळ नसतो ते जन्मदिवस करायला येत नाही. दिवाळीलाही येत नाही. त्याची फार अशी खंत माझ्या मनात नाही पण त्या वृद्धाश्रमातील काम करणाऱ्या बाईने मला एक दिवस फोन केला आणि धसाधसा रडायला लागली. मी म्हटले काय झाले विद्याताई? आज रडायला. ती म्हणाली साहेब सगळ सहन केल पण हे नाही सहन झाल. मी म्हणालो काय नाही सहन झाल. नाही म्हणाली त्या आमच्या बाई आज वारल्या त्यांच्या मुलाला कळवल. मुलाने फोनवर मला सांगितले

मी येऊन जे करणार आहे ते तुम्ही करवून घ्या आणि बील फक्त पाठवून द्या. या मुक्कामावर तुम्ही हे पुस्तक वाचा. जेव्हा घराची घरपण संपतात आणि घरात जागा नाही म्हणून सांगतात. एका बाईने मला सांगितले की सासऱ्याला मला वृद्धाश्रमात ठेवावे लागले कारण घरात जागा नाही. मी तिला विचारले की काय तुझी आई आली तर? ती म्हणाली आईची गोष्ट वेगळी असते. मनातच जागा नसते. ज्यांच्या मनातच जागा नसते त्यांचा राजमहाल असला तरी घरात जागा नसते. आणि ज्यांच्या मनात जागा असते ना त्यांच्या झोपडीमध्येही जागा असते. तुमच्या मनातल्या जागाच गेल्या (टाळ्या) तुम्ही घराचे घरपण घालवले. संस्था कराव्या लागत नसतात, संस्था होत असतात. हे संयुक्त कुटुंबाने मला शिकविले. माझा धाकटा नातू आहे आम्ही जेवायला बसलो होतो चार न्यायमूर्ती एकत्र. त्याच्या आईने त्याला काहीतरी सांगितले की माझ्या कानात जाऊन सांग. तो कानाजवळ आला आणि मोठ्याने ओरडला की बाबा भाजी संपली आता मागायची नाही. (हशा) त्याची आई नाराज झाली, त्याची आजी नाराज झाली, त्या मुलाला काय माहिती की खोट आणि खरे केव्हा बोलावे. सात दिवसांनी त्याच्या काकाचा फोन आला. काकाने घरी असताना त्याला सांगितले की सांग मी घरी नाही. त्यादिवशी तो मुलगा खोट बोलणे शिकला. खरे बोलणे शिकवावे लागत नाही. खोट बोलणे शिकवावे लागते. आणि तुम्हाला वाईट वाटेल ते मी सांगू इच्छितो. आता मी पणजोबा झालोय ''माझ्या नातवांवर चांगले संस्कार करण्याच्या भानगडीत पडू नका. फक्त तुमच्या वाईट संस्कारापासून त्यांना वाचवा.'' (टाळ्या) संयुक्त कुटुंब पद्धतीमध्ये बाईंनी बाहेरच्या सगळ्या वादापासून कू संस्कारापासून हे घर वाचविले आणि या कू संस्कारापासून दूर ठेवीत एक सशक्त संयुक्त कुटुंब उभे केले. यातल्या पानामधून तुम्हाला कळेल की माणुस जगतो तो स्वतासाठी. स्वतासाठी जगतो की इतरांसाठी जगतो याचा हिशेब नसतो. त्याच्यात त्यागाची भावना असते. यामध्ये बाई इतरांसाठी जगते असेही म्हणत नाही. मी किती सोसल असेही ती म्हणत नाही. आम्ही दोघ फक्त जगलो एवढेच ती म्हणाली. या दोघांच्या जगण्याला मी सहजीवन म्हणतो आणि हे पुस्तक म्हणजे सहजीवनाचे प्रतिक आहे असे मी मानतो. तुम्ही ते वाचावे असे म्हणेल. विकत घेऊन वाचावे असेही मी म्हणेल. जी एक सवय असते ती याबाबतीत नाही. मला हरकत नाही आहे परंतु चांगली पुस्तके जर यायची असतील तर थोडी सवय लावावी लागेल. मी याचे प्रकाशन केले नाही पण मी थोड तुम्हाला सांगु इच्छितो तसे पुस्तकांचे पुष्कळ प्रकाशने करतो. पण माझी वाईट खोड आहे मी ज्या पुस्तकाचे प्रकाशन करतो त्याची पहिली प्रत स्वतः विकत घेत असतो. त्याच्याशिवाय आम्ही प्रकाशन नाही करत. त्याच कारणही तेच आहे. पण भाऊंनी शेवटच्या दिवसामध्ये एक गांधी सेंटर काढायचे ठरविले. जागतिक स्तराचे गांधी सेंटर जैन हिल्सवर होईल अशी त्यांची योजना आहे. योजना पूर्ण होईल न होईल. पण भाऊ मी तुम्हाला एक सांगू इच्छितो आपल्या अपयशामध्येही फार शक्ती असते, गांधींनी आम्हाला सांगितले होते की अपयश नसतेच ते. यशच असते ते. एका अपयशामधून एका मोठ्या यशाची वाढ होत असते आणि म्हणून आम्ही नेहमी म्हणतो की जटायूचे अपयश हे रावणाच्या यशापेक्षा कितीतरी मोठे होते. लोक काहीही म्हणत असले तरी तुम्ही आज शंभर वर्षे झाली गांधीच्या हिंदस्वराज पुस्तकाला, जगभरात त्याच्या सेमीनारसाठी आणि वर्कशॉपसाठी मी जात असतो. त्या पुस्तकातील जी एक संस्कृतीची लाट आली आहे त्या पुस्तकामधला गांधींच्या स्वप्नातला भारत अभिप्रेत होता तो तुम्ही जैन हिल्सवर उभा करण्याचा प्रयत्न केला म्हणून तुमचे अभिनंदन करतो. बाईंनी तुम्हाला साथ दिली पण भाऊ तुम्हाला सांगु इच्छितो पुष्कळदा आठवणी या सोबतीपेक्षा मोठ्या असतात आणि या आठवणीच्या भरवशावर माणुस सशक्तपणे जगू इच्छितो आणि आठवणींच्या भरवशावर इतक्या सशक्तपणे माणूस जगतो की आयुष्यामध्ये कधीच पाऊल वाकडे पडत नाही. ती शक्ती त्या आठवणींमध्ये असते, ती शक्ती तुम्हाला व तुमच्या कुटुंबियांना द्यावी अशी धर्माधिकारी म्हणून भगवंताकडे प्रार्थना करतो. तुम्हा सगळ्यांना नमस्कार.

# विजयाबाई राजाध्यक्ष

या पुस्तकाचे लेखक आदरणीय भवरलालजी जैन, प्रकाशक श्री. अशोक कोठावळे, माझे खूप जुने मित्र आणि प्रसिद्ध कवि श्री. ना. धों. महानोर, डॉ. भालचंद्र नेमाडे, 'खासदार भरतकुमार राऊत आणि आदरणीय न्यायमूर्ती श्री. चंद्रशेखर धर्माधिकारी आणि इथे या पुस्तकाच्या प्रकाशनासाठी अत्यंत वेळेवर आणि खूप मोठ्या संख्येने आलेल्या बंधु-भगिनींनो,

खरं तर या पुस्तकाविषयी इतक्या वेगवेगळ्या दृष्टिकोनातून आत्तापर्यंत बोललं गेले आहे की, काय बोलावं हा माझ्यापुढे तरी पेचप्रसंग आहे! सुरुवातीला अशोक कोठावळे

यांनी या पुस्तकाचा अतिशय मार्मिक असा परिचय करुन दिला. कविवर्य महानोर या पुस्तकाच्या लेखकांविषयी आणि त्यांच्या कुटुंबाविषयी अतिशय जिव्हाळ्याने बोलले. कारण त्या कुटुंबाचे ते सदस्यच आहेत. डॉ. नेमाडे यांनीही वैश्विक पातळीवर एकूण हे पुस्तक कोणते प्रश्न त्यांच्या मनात निर्माण करते हे सांगितलं. भरतकुमार राऊत यांनीही स्त्रीच्या संवेदनेने हे पुस्तक कसं लिहिले आहे, याची एक फार चांगली मांडणी केली आणि शेवटी न्यायमूर्तींनी या पुस्तकांकडे पाहण्याचा एक अतिशय संयत आणि ज्याला एका अर्थाने गांधीवादी म्हणता येईल असा जो दृष्टिकोन आहे तोही फार प्रभावीपणे मांडला आहे. त्यामुळे काय बोलावे हा पेचप्रसंग आहे. पण तो सूत्रसंचालकांनी सोडवला.

स्त्रीच्या दृष्टिकोनातून या पुस्तकाविषयी मी बोलावं अशी सूचना त्यांनी मला केली आणि मला ते मार्गदर्शक असे ठरले. खरं तर मी त्याच दृष्टिकोनातून हे पुस्तक वाचले आहे आणि ते पुस्तक मी तीनदा वाचले आहे. दोनदा मुखपृष्ठाविना आणि आत्ता पाहिलं ते मुखपृष्ठासकट आणि ते मुखपृष्ठासकट पाहणं अत्यंत आवश्यक होतं. आतला मजकुर असे म्हणू या हवं तर. हे मला ते मुखपृष्ठ पाहिल्यावर कळलं. याचे कारण असे आहे की, जे मुखपृष्ठ आहे ते अतिशय समर्पक आहे. मला असे वाटते की, खासदारांनी त्या मुखपृष्ठाचा अर्थ लावला. मलाही एका वेगळ्या पद्धतीने तो अर्थ लावावा वाटला की, त्या पुस्तकामधील जी 'ती' प्रथम आहे 'मी' जो आहे पान उलटल्यानंतर दिसतो. खरं तर या स्त्रीच्या खिडकीतून त्या 'मी' कडे पाहतो आणि ती स्त्री इतकी उदार आहे, की 'तो' खिडकीतून पहात असला आणि डोकावत असला, तरीही त्याची पर्वा न करता आणि त्याच्या एकूण कुतूहलाविषयी आणि भाविकतेविषयी फारसा विचार न करता, त्याला आपले संपूर्ण दर्शन देते. याचे कारण 'ती' आदी माया आहे किंवा रामदास भटकळांनी नुकतेच लिहिलेलं आणि ज्याचे काही प्रयोग झालेत आणि पुढेही काही होणार आहेत तशी जगदंबा आहे. जगदंबा यामधल्या 'जगत' वर मी भर देते.

या पुस्तकाची जी प्रस्तावना आहे ती अतिशय विवेचक आहे, अतिशय मार्मिक मुद्दे तिच्यामध्ये उपस्थित केलेले आहेत. त्याबद्दल पुन्हा बोलणे हे ध्याष्टाचं ठरेल. पण मी ती वाचली आहे आणि ती सुद्धा तीनदा वाचली आहे. फक्त पुस्तक नव्हे, तर तुमची प्रस्तावनाही तीनदा वाचली आहे. मलाही नेमाड्यांप्रमाणे, आत्ता जसे ते बोलले तेव्हा मी अतिशय सावधपणे ऐकत होते. मला असे वाटले की, या पुस्तकामध्ये एक देशीपण आहे. खरं तर भवरलालजी ज्यांनी खूप भ्रमंती केली आहे, या देशात, परदेशात त्याचा एकूण जो परामर्शमध्ये काही पानांमध्ये घेतलेलाच आहे. पण असे असूनही ते देशी राहिलेत, कारण त्यातली 'ती' ही पूर्णपणे देशी आहे. तिने जरी त्यांच्याबरोबर प्रवास केलेले असले तरी. कारण, परदेश प्रवास हा त्यांच्या आयुष्याचा एक लहान भाग होता. सहप्रवास हा खरा महत्त्वाचा आणि तो खानदेशातल्या वेगवेगळ्या गावांमध्ये केलेला आणि खानदेशी मातीतच. महानोरांना खूश करण्यासाठी मी असे म्हणत नाही आहे. पण मला नेहमीच वाटते की, ज्या मातीने आपल्याला बहिणाई दिली ती माती कांताबाई देणारच. कारण त्या मातीमध्ये अशी काही बिजे आहेत, की जी या पद्धतीने अंकुरणारच. तिनेच आपल्याला महानोरांची कविता दिली आणि तिची कहाणीही आपल्याला सांगितलेली आहे आणि ती कहाणी काही फार सुखदाई अशी कहानी नाही. जशी या मधल्या तिची कहाणी ही अगदी भरभरुन यावे आणि आनंदून जावे अशी नाही. मी म्हटले की, हे देशी आहे पण देशी असले किंवा स्थानिक असले एका अर्थाने तरी सुद्धा ते वैश्विक होतं इतकं मोठ्ठं सत्य स्त्री विषयी, कुटुंबाविषयी पती–पत्नींच्या नात्याविषयी, कुटुंबाचा विस्तार हे कधी दोघं मिळून तर कधी एकटी कशी करतात या विषयी इथे अतिशय मौलिक पण कुठलेही प्रवचन न करता, हे विचार मांडलेले आहेत आणि त्यामुळे एक प्रकारचे साधारणीकरण या पुस्तकाला प्राप्त झालेली आहे, हा एक संस्कृत साहित्य शास्त्रज्ञ अभिनव गुप्त यांचा सिद्धांत आहे, त्याचा मी उल्लेख करते.

इथे भावविवशता नाही, उदात्तीकरणही नाही, म्हणजे त्याच्या जागा भरपूर आहेत. पण त्या टाळलेल्या आहेत, कदाचित जाणीवपूर्वक भवरलालजींचं व्यक्तिमत्त्वच असे आहे की, त्यांना त्या सहजपणाने टाळता आलेल्या आहेत. आत्ता नेमाडे यांनी सोशल ग्रामरचा उल्लेख केला आहे. आम्ही शाळेत जे शिकलो आणि नंतर कदाचित विसरलो त्या मो. र. केशव दामलेंचा उल्लेख करते. हे जे शिर्षक आहे त्यात सर्वनामं आहेत. 'ती' हे सर्वनाम आणि 'मी' हेही सर्वनाम पण हे पुस्तक वाचल्यानंतर आपल्याला आता मी म्हटल्याप्रमाणे कळते, ही जरी सर्वनामे असली तरी प्रथम ती विशिष्ट व्यक्तींची नावे आहेत म्हणजे कांताबाई आणि भवरलालजी, म्हणजे विशेषनामे आहेत आणि अनेक अर्थाने या नावांना हे विशेषत्त्व प्राप्त झालेले आहे.

आणखी पुन्हा एका गोष्टीचा उल्लेख करते की, व्याकरणीक अशा पातळीवर की, यातलं हे उभयान्वयी अव्यय

आहे तेही फार महत्त्वाचे आहे. ते दोन समान व्यक्तींना जोडते. 'ती किंवा मी' नाही, 'ती परंतु मी' नाही, 'ती आणि मी' आणि या 'आणि' ला मला वाटते की, फार महत्त्व आहे. आणखी थोडे व्याकरणाविषयी बोलायचं झाले तरी हे जे निवेदन आहे ते प्रथमपुरुषी आहे. पण ते प्रथमपुरुषी वाटत नाही. आपण म्हणालात त्याप्रमाणे हे एकमुखी नाही हे द्विमुखीय आहे. तो जो आवाज आहे, तो आपल्याला त्याच्या आवाजातून ऐकू येतो. इतकंच नव्हे, तर ते बहुमुखी आहे असे सुद्धा मी म्हणेल. याचं कारण भवरलालजींनी फक्त स्वत: कांताबाईविषयी न सांगता त्यांनी यामध्ये त्यांच्या संदर्भात आलेले पत्र, त्यांच्या बद्दलच्या आठवणी, त्यांच्या कधी कोण जाणे पण घेतलेल्या मुलाखती यांचाही आवर्जून उल्लेख केलेला आहे. त्यामुळे फक्त भवरलालजी कांताबाईंविषयी बोलत आहेत असे नव्हे, तर आजूबाजुची माणसं ही त्याच पद्धतीने विचार करतात हे कळते.

एका प्रेमापोटी एका व्यक्तीविषयी चांगले बोलणे हे वेगळे. एका व्यक्तीनं आणि अनेक व्यक्तींनी तिला एकूण जणू अनुमोदन देणं ही गोष्ट वेगळी आणि ती इथे झालेली आहे, यामुळे या पुस्तकाची जी मांडणी आहे किंवा घाट आहे. आपण मला वाटते की, राऊतजींनी उल्लेख केलेला आहे. चरित्र, आत्मचरित्र दोन्ही त्यामध्ये सरमिसळ झालेले आहे हे तर खरंच आहे. परंतु एक प्रकारे त्याला मुक्त असे स्वरुप आलेले आहे. याला चरित्र म्हणावं की, आत्मचरित्र म्हणावं की आठवणी म्हणाव्यात. काय म्हणावं नेमकं? हे कळत नाही आणि एखादं चांगलं पुस्तकच असे घाटा विषयीचे संभ्रम आपल्या मनात निर्माण करू शकतो. कारण तो घाट कधीही बंदिस्त नसतो. त्याला एक मुक्तपणा असतो आणि तो मुक्तपणा लेखकाने दिलेला असतो. बंदिस्तपणा हा आहे. तो प्रतिभासाधनमध्ये सुद्धा वगैरे अगदी पुर्वीपासून ठाऊक झालेला आहे आणि त्याचे मी महत्त्व नाकारत नाही. परंतु त्या पलीकडे कसे जायचे हे भवरलालजींना कदाचित उपजत असावं पुस्तक लिहिलेलं असावे किंवा कदाचित जाणीवपूर्वकसुद्धा ते त्यांनी केलेले आहे आणि याचे कारण हे पुस्तक उघडल्यावर माझ्या असे लक्षात आले आहे. तोपर्यंत भवरलालजी मला माफ करा मला आपण इतर जे जे काही लिहिलेले आहे ते फार कमी माहिती होते. त्यामुळे हे पुस्तक वाचताना असा प्रश्न पडला होता की, अरे इतकं प्रगल्भ असे निवेदन आणि इतकी स्वच्छ सुगम अशी भाषा प्रथमच एखादा पुस्तक लिहिणारा माणूस कशी काय अवलंबात आणू शकतो? पण तसं नाही. त्यामागे एक साधना आहे आणि साहित्या विषयीची ती साधना आहे. साहित्य म्हणजे काय? आणि ते कशा पद्धतीने आपण एकूण निर्माण केले पाहिजे याविषयीची सैधांतिक नव्हे, परंतु अतिशय नैसर्गिक कल्पना आहे. म्हणूनच पारदर्शकतेचा उल्लेख झाला, ती पारदर्शीकता मनाची पण आहे आणि भाषेचीही आहे. कुठेही वाचताना आपण अडखळत नाही. हे मी मुद्दाम सांगते आहे याचं कारण, एका वेगळ्या समाजात वाढलेली दोन माणसं आहेत आणि त्यामुळे त्या समाजात प्रचलित असे काही शब्द असे काही वाक्यसुद्धा दोघांच्या संवादात येणे शक्य होतं आणि आले असते तरी ते काही अनाठायी झाले नसते. परंतु भवरलालजींनी तसे केलेले नाही आणि त्यामुळे कुठेही आपण अडखळत नाही. अतिशय सरळपणानं ज्या ओघवत अशा शैलीत ते लिहिलेले आहे त्या प्रवाहाला अनुसरच अशा पद्धतीनेच ते पुस्तक वाचत जातो आणि आपल्याला असे जाणवत जाते की, अनेक केंद्र या पुस्तकाला आहेत. अर्थातच दोन प्रमुख केंद्र. 'ती आणि तो' 'ती आणि मी' म्हणजे भवरलालजी. परंतु ही दोन केंद्र मात्र अवतीभवती अनेक केंद्र जरी निर्माण केलेली असली तरी सुद्धा पक्की आहेत आणि स्थिर आहेत आणि हे चिंतन आहे. ते चिंतनही निरीक्षणं आणि अनेक घटना प्रसंग यांवर आधारलेले आहे. यांच्याभोवती अतिशय पक्क्या पद्धतीने मांडल्या आहेत. आता हा जो काळ आहे तो फारसा मागचा काळ नाही. पण मनामध्ये असे येते की, हे सर्व ज्या काळात घडले आणि तो काळ कांताबाईंच्या निधनानंतर एका अर्थाने अंशत: संपला. तरी ते संयुक्त कुटुंब अतिशय उत्तम पद्धतीनं पुढे चालले आहे. आताही असेच घडेल का? असा एक प्रश्न मनात येतो आणि त्याचे प्रामाणिक उत्तर स्त्रीच्या दृष्टीकोनातून पुन्हा द्यायचे झाले, तर मी असे म्हणेल की, अंशत: घडेल काही कुटुंबात घडेल. पण पूर्णत: तसं घडणार नाही ही एक दुर्दैवी अशी घटना समाजाची आणि कुटुंबाची स्थिती आपण अनुभवतो आहे. त्याला अनेक कारणं आहेत. कदाचित मी जाता जाता त्यांचा उल्लेखही करेल. पण करेलच असेही नाही कारण वेळेचेही बंधन टाकण्यात आलेले आहे आणि मी स्त्री म्हणून कदाचित किंवा पुस्तकाचं प्रकाशन केले म्हणून कदाचित मला पाच मिनीटे अधिक दिली. त्यांचे कारण त्यामागील असू शकते.

■■■